# शासकीय कला महाविद्यालय- वाटचाल 'नवीन पाऊलवाट'

प्रा. गो. कृ. देशपांडे



'रंगरेखा' वार्षिक ८८ हा शासकीय कलामहाविद्यालयाचा पहिलाच अंक! त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेणे औचित्याचे ठरेल. या भूमिकेतून या महाविद्यालयाचे प्रथम माजी अधिष्ठाता प्रा. गोविंद कृ. देशपांडे व विद्यमान अधिष्ठाता प्रा. म.भा. इंगळे यांनी आपले विचार मांडले आहेत. ते वाचकांना रसपूर्ण वाटतील. 'नवीन पाऊलवाट' निर्मिली आहे. प्रा. गो. कृ. देशपांडे यांनी.

या संस्थेच्या प्रेमातून उद्‌भवलेल्या भावनोत्कट शब्दात वाचा_ त्यांनी निर्मिलेली 'नवीन पाऊलवाट'.....

मराठवाडा विभागाच्या परिसरात भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेच्या खुणा जागोजागी आढळतात. आंतरराष्ट्रीय कीर्तिची वेरूळची लेणी, अजिंठा गुंफातील जगप्रसिद्ध भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारी भित्तीचित्रे ही ह्या विभागाचीच नव्हे तर सबंध भारताची भूषणे आहेत. भारतीय पारंपारिक कलेची इतकी अभिरुचीपूर्ण, सौंदर्यदृष्ट्या अप्रतिम अशी उदाहरणे ह्या विभागात असतानासुद्धा १९७१ सालापर्यंत दृक कलांचे शास्त्रोक्त पद्धतीने उच्च कला शिक्षण देणारी सर्व सोयींनी परिपूर्ण अशी एकही शासकीय संस्था ह्या विभागात नव्हती. सर्व विभागीय स्तरावर निदान एकतरी शासकीय कला संस्था स्थापण्याच्या दृष्टीने शासनाने १९७१ च्या जूनमध्ये औरंगाबाद येथे अशी पहिली संस्था सुरू केली. ती संस्था म्हणजे शासकीय कला महाविद्यालय (गव्ह. स्कूल ऑफ आर्ट) औरंगाबाद.

आता ही संस्था षोडश वर्षीय झाली असून, यौवनावस्थेस पोहोचली असतानाच संस्थेचे विद्यार्थी मंडळ ''रंगरेखा'' संस्थेच्या वार्षिक नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित करीत आहे. ह्या वार्षिक विशेषांकाचे संपादक प्रा.सुधारक लवाटे असावेत हा एक विशेष योगायोगच म्हणावा लागेल. कारण १९७१ साली ह्या संस्थेची जेव्हा स्थापना झाली, तेव्हा जे पहिले तीन शिक्षक नियुक्त करण्यात आले होते त्यापैकी ते एक होत. (आणि या संस्थेचा तेव्हाचा पहिला संस्था प्रमुख. मी, अधिष्ठाता पदावर निवृत्त होवून आता आपले उर्वरित आयुष्य आपल्या विविध कला-छंदात सुख समाधानाने पुण्यात घालवीत आहे.)

अशा व्यक्तीला त्याच्या प्रेरणेतूनं काहीतरी नवीन घडत असताना, त्याच्या उत्साहावर पाणी न ओतता तो द्विगुणित करावा, ह्या एकाच विचाराने गत काळातील स्मृतींना उजाळा देण्याचा हा प्रयत्न. जुन्या आठवणीतून प्रेरणा घेऊन ह्या पिढीतील नवोदित शिक्षकांनी, तसेच विद्यार्थ्यांनी नवनवीन उपक्रम सुरू करून संस्थेची प्रगतीपथावरील ह्या पुढली वाटचाल निष्ठेने चालू ठेवावी हा एक विचारही मनात डोकावला म्हणूनच हा प्रयास.

संस्थेच्या पहिल्या पाच वर्षाच्या निर्मिती काळाचा आढावा घ्यावयाचा म्हटले तर एक ग्रंथ लिहिणे सोपे जाईल पण जागेअभावी थोडक्यात लिहावयाचे म्हणजे दुधाची तहान ताकावर निभावण्यासारखेच आहे. काही गोष्टीचा इच्छा असूनही उल्लेख करता येणार. खरी परिस्थिती कळली तरच तत्कालीन प्रगतीच्या वाटचालीची अंशतः तरी जाणीव होईल अन्यथा नाही. हे स्पष्ट करून ह्या पुढील शब्दांकन, प्रथम संस्थेच्या घडण काळातील अडीअडचणी, त्यावर केलेली मात, तत्कालीन कला शिक्षण क्षेत्रातील वातावरण व परिस्थिती या संदर्भात करून, नंतर संस्थेला लोकाभिमुख करण्यासाठी केलेले प्रयत्न व उपक्रम अर्थात संस्थेची सर्वांगीण वाढ, काही ''खट्टा-मिठा'' सदरात मोडतील असे अनुभव अशा स्वरुपात करावे असे वाटते. ह्या दृष्टिकोनातूनच पाहणे उचित ठरेल.

मराठवाडा विभागाची एक नितांत गरज म्हणून शासनाने १९७१ साली औरंगाबाद येथे शास्त्रोक्त पद्धतीने उच्च कला शिक्षण देण्याच्या हेतूने एक सर्व दृष्ट्या आदर्श व परिपूर्ण असे कला महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळच्या परिस्थितीनुसार महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातील छोटी मोठी जवळ जवळ २५ खाजगी कला महाविद्यालये वगळता मुंबई येथील दोन व नागपूर येथील एक अशी तीनच शासकीय कला महाविद्यालये अस्तित्वात होती. त्या परिस्थितीचा आढावा घेऊन शासनाने त्या वेळच्या पंचवार्षिक योजनेत प्रत्येक विभागात विभागीय स्तरावर एक शासकीय कला महाविद्यालय उघडावे असे ठरवून त्यावर्षी पहिले कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे सुरू करण्याचे ठरविले. पुढे क्रमाने विदर्भात अकोला किंवा अमरावती येथे तर पश्चिम विभागासाठी जळगाव, नाशिक अथवा कोल्हापूर येथे सुरू करण्याच्या विचारात शासन होते. कला महाविद्यालयाची निर्मिती ही कला संचालनालयाच्या अखत्यारीतील बाब असल्या कारणाने तिच्या नियोजनाची सर्व